**पीएम-किसान योजना**

**कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय**

**कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग**

## पीएम किसान योजनेतील ई-केवायसीच्या पद्धती आणि प्रक्रियांवर टीप

**संक्षिप्त माहिती :**

पीएम किसान योजना, देशभरातील जमीनधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी फेब्रुवारी 2019 मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात तीन समान हप्त्यांमध्ये प्रति वर्ष रुपये 6,000/- हस्तांतरित केले जातात.

**e-KYC (ई-केवायसी) कशासाठी ?**

कोणत्याही मध्यस्थांच्या सहभागाशिवाय पीएम किसान योजनेचा लाभ पात्र लाभार्थींना त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये पोहोचेल याची खात्री करण्यासाठी

**ई-केवायसी च्या पद्धती:**

**पीएम किसान योजनेतील शेतकऱ्यांसाठी ई-केवायसी चे खालील तीन पध्दती उपलब्ध आहेत:**

i. OTP आधारित e-KYC (पीएम किसान पोर्टल आणि मोबाइल ॲपवर उपलब्ध)
ii. बायोमेट्रिक आधारित ई-केवायसी (सामाईक सुविधा केंद्र (सीएससी) आणि राज्य सेवा केंद्र (एसएसके) येथे उपलब्ध)
iii. फेस ऑथेंटिकेशन आधारित ई-केवायसी (पीएम किसान मोबाइल ॲपवर उपलब्ध असून या ॲपचा वापर लाखो शेतकरी करतात)

- **ओटीपी आधारित ई-केवायसी**

ओटीपी आधारित ई-केवायसी कार्यान्वित करण्यासाठी, शेतकऱ्याकडे आधार लिंक केलेला सक्रिय मोबाइल नंबर असणे आवश्यक आहे. यासाठी खाली दिलेल्या क्रमवारीनुसार जावे:

i. पीएम किसान पोर्टलला भेट द्या (https://pmkisan.gov.in/)
ii. ई-केवायसी वर क्लिक करा (वेबसाइटच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात)
iii. तुमचा आधार क्रमांक नमूद करा आणि तुमचा OTP नमूद करून तुमचे eKYC पूर्ण करा.

- **बायोमेट्रिक आधारित ई-केवायसी:**

ही सुविधा देशभरातील 4 लाखांहून अधिक सामाईक सुविधा केंद्रे आणि विविध राज्य सेवा केंद्रांना उपलब्ध करून देण्यात आली आहे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या दारात/शेजारी या सेवा पुरविल्या जातील. यासाठी खाली दिलेल्या क्रमवारीनुसार जावे:

i. तुमचे आधार कार्ड आणि आधार लिंक केलेल्या मोबाईल नंबरसह तुमच्या जवळच्या सामाईक सुविधा केंद्र (CSC) / राज्य सेवा केंद्रांना (SSK) ला भेट द्या
ii. सामाईक सुविधा केंद्र (CSC) / राज्य सेवा केंद्र (SSK) मधील ऑपरेटर आधार-आधारित पडताळणी वापरून बायोमेट्रिक प्रमाणीकरण करण्यात शेतकऱ्याला मदत करेल.

**टीप:**

i. सर्वात जवळचे CSC https://locator.csccloud.in/ येथे उपलब्ध आहे.
ii. एका ई-केवायसी साठी सुविधा शुल्क रु. 15 /-

❖ **फेस-ऑथेंटिकेशनद्वारे ई-केवायसी:**

शेतकरी स्वतःच्या सोयीनुसार त्यांच्या मोबाईलद्वारे ई-केवायसी देखील करू शकतो. ई-केवायसी करण्याचा हा सर्वात नाविन्यपूर्ण आणि त्रासमुक्त मार्ग आहे. क्रमवारी खाली दिली आहे.

i. Google Play Store वरून PM-KISAN Mobile App आणि Aadhaar Face RD App डाउनलोड करा
ii. ॲप उघडा आणि तुमच्या पीएम किसान नोंदणीकृत मोबाइल नंबरद्वारे लॉग इन करा
iii. लाभार्थी सद्यस्थिती पृष्ठावर जा (Beneficiary Status Page)
iv. ई-केवायसी स्थिती "No" (नाही) असल्यास, eKYC या बटणावर क्लिक करा, नंतर तुमचा आधार क्रमांक प्रविष्ट करा आणि तुमचा चेहरा स्कॅन करण्यासाठी तुमची संमती द्या.
v. तुमचा चेहरा यशस्वीरित्या स्कॅन केल्यानंतर, ई-केवायसी पूर्ण होते.

**टीप:**

i. कोणत्याही पद्धतीने केलेल्या ई-केवायसी ची स्थिती 24 तासांनंतर लाभार्थीच्या स्टेटस मध्ये दिसून येईल.
ii. पीएम किसान पोर्टल आणि किसान-eMitra (PM-KISAN AI चॅटबॉट) वरील KYS मॉड्युलवरून शेतकरी त्यांची स्थिती देखील पाहू शकतात.